कार्यालय पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, हिंगोली

लाप्र.वि.हिंगोली,जि.हिंगोली
दिनांक :- 31.08.2023

# प्रेसनोट

**ईलोसे जमिलखान महमदखान पठाण वय 70 वर्षे, व्यवसाय - नौकरी, पद – तांत्रीक सहायक (कंत्राटी) म.ग्रा.रो.ह.योजना विभाग,पंचायत समीती हिंगोली,जि.हिंगोली रा.इंडीयन बेकरी जवळ, आझम कॉलनी, हिंगोली.ता.जि.हिंगोली यांना 10,000/- रू.ची लाच स्विकारले प्रकरणी ताब्यात घेण्यात आले असुन त्यांचे विरूध्द गुन्हा दाखल झाले बाबत.**

---

पिडीत तक्रारदार व त्यांचे गावातील इतर दोन शेतक-यांना महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना सन 2022-2023 अंतर्गत अहिल्याबाई होळकर सिंचन योजनेतुन विहीरी मंजुर झालेल्या आहेत.तक्रारदारासह दोन्ही शेतक-यांनी सदर विहीरीचे बांधकाम पुर्ण केले असुन आज पर्यंत तक्रारदार यास 2,63,000/- रूपये व इतर दोन शेतक-यांना जवळपास 2,50,000 /- रूपये अदा करण्यात आले असुन त्यांचे कुशलचे बिल (शेवटचा हप्ता) येणे बाकी आहे.

त्याबाबतच्या नोंदी मोजमाप पुस्तिकेमध्ये घेऊन प्रस्ताव पंचायत समिती हिंगोली येथे दाखल करून सदर कुशल चे बिल (शेवटचा हप्ता) लवकरात लवकर काढण्यासाठी यातील ईलोसे जमील खान महंमद खान पठाण, तांत्रिक सहाय्यक (कंत्राटी) महाराष्ट्र राज्य रोजगार हमी योजना विभाग,पंचायत समिती हिंगोली हे तक्रारदार यांना त्यांचे व इतर दोन शेतक-याचे असे प्रत्येकी 5000/-रूपये ते 6000/- रूपये लाचेची मागणी करीत असल्याबाबत तक्रारदार यांनी ला.प्र.वि.कार्यालय हिंगोली येथे येवून लेखी तक्रार दिल्याने आज दि.30/08/2023 रोजी तक्रारदार यांना पडताळणी कारवाई दरम्यान ईलोसे यांनी पंचासमक्ष तडजोडी अंती प्रत्येकी 5000/- रूपये असे एकुण 15,000/- रूपये लाचेची मागणी करून तक्रारदार व इतर एक शेतकरी यांचे विहीरीचे बांधकाम पुर्ण झालेल्या बिलांच्या नोंदी मोजमाप पुस्तिकेमध्ये घेऊन प्रस्ताव पंचायत समिती हिंगोली येथे दाखल करून सदर कुशल चे बिल (शेवटचा हप्ता) लवकरात लवकर काढण्यासाठी एकुण लाचेची रक्कम 10,000/- रू. पंचासमक्ष स्विकारले असुन आज रोजी 17:38 वाजता ईलोसे यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे.त्याअनुषंगाने पोलीस स्टेशन हिंगोली शहर जि.हिंगोली. येथे गु.र.न.731/2023 कलम 7 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे..

ही कामगिरी श्री. राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परीक्षेत्र, नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली श्री अनिल कटके, पोलीस उप अधीक्षक,श्री.प्रफुल्ल अंकुशकर पोलीस निरीक्षक,श्री.विनायक जाधव पोलीस निरीक्षक, स.पो.उप.नि/युनुस शेख,विजय शुक्ला, पोहेकॉ/ज्ञानेश्वर पंचलींगे,रविंद्र वरणे, तानाजी मुंढे, भगवान मंडलीक, गजानन पवार, चापोह/ शेख अकबर,पोना/ गोविंद शिंदे व पोशि/शिवाजी वाघ सर्व लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, हिंगोली यांचे मदतीने यशस्वीपणे केलेली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, हिंगोली तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी खाजगी इसम (एजंट) यांनी कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर परीश्रमीका व्यतिरीक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास कृपया लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयाशी संपर्क साधावा. कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी लाचलुपचपत प्रतिबंधक कार्यप्रणाली बाबत वा तक्रारी बाबत माहिती पाहिजे असल्यास खालील मोबाईल व दुरध्वनीवर संपर्क साधावा. तसेच तक्रारदार यांना तक्रार देण्यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभागा मार्फत मोबाईल ॲप www.acbmaharashtra.net हे सुरू करण्यात आले आहे.

**टोल फ्री क्र.1064, दुरध्वनी क्र.02456-223055,**
**मोबाईल क्रमांक :- 9623999944,9870221379,8888578999**